# प्रसार माध्यमांचा साहित्य आणि संस्कृतीवर होणारा परिणाम

साक्षी शिवाजी चव्हाण
दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ भाऊराव काकतकर कॉलेज, बेळगाव.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.18144033

**ABSTRACT:**

हा लेख आधुनिक प्रसारमाध्यमांचा साहित्य आणि संस्कृतीवर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा ऊहापोह करतो. गेल्या दशकात इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे मानवी जीवनशैली, वाचन-लेखन आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीत अमूलाग्र बदल झाले आहेत. प्रसारमाध्यमांनी साहित्याला जागतिक व्यासपीठ मिळवून दिले असून भाषिक अडथळे ओलांडून ज्ञानप्रसार सुलभ केला आहे. मात्र, या प्रक्रियेत पाश्चात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव, पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास आणि साहित्याचा घसरलेला दर्जा ही आव्हानेही निर्माण झाली आहेत. तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करून स्थानिक संस्कृतीचे जतन आणि साहित्याची समृद्धी साधणे आवश्यक असल्याचे निष्कर्ष या लेखात मांडण्यात आले आहेत.

**KEYWORDS:**

प्रसारमाध्यमे, डिजिटल संस्कृती, मराठी साहित्य, जागतिकीकरण, सांस्कृतिक संवर्धन.

**प्रस्तावना:**

अलीकडच्या दहा-पंधरा वर्षांत इंटरनेट-आधारित डिजिटल माध्यम, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ऑडिओ-स्ट्रिमिंगने लोकांच्या वाचन, लेखन आणि सांस्कृतिक वापराच्या पद्धतीत मूलभूत बदल घडवले. हे बदल सकारात्मकही आहेत आणि आव्हानात्मकही -दोन्ही प्रकारचे प्रभाव विवक्षितपणे जाणून घेणे गरजेचे आहे.

• भारतातील सक्रिय इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे; डिजिटल आणि सोशल मीडिया वापर प्रचंड आहे; एक अंदाजानुसार भारतात 800 दशलक्षाभोवती इंटरनेट यूझर्स आणि जवळपास 490 दशलक्ष सोशल-मीडिया प्रोफाइल्स आहेत -म्हणजे जगातील सर्वात मोठ्या डिजिटल लोकसंख्यांपैकी एक.

• सविस्तर मीडिया आणि एंटरटेनमेंट क्षेत्रात डिजिटल (ऑनलाइन) महसुलांचे योगदान वेगळे आणि मोठे होत आहे; डिजिटल

माध्यमाने पारंपरिक टेलिव्हिजनपेक्षाही जास्त वाढ दाखवली आहे. हे बदल साहित्य आणि कथाकथनाच्या वितरणाच्या मार्गांवर थेट परिणाम करतात.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, रेडिओ आणि चित्रपट यासारख्या विकसित होणाऱ्या मास मीडिया तंत्रज्ञानाला प्रेक्षकांच्या श्रद्धा, आकलनशक्ती आणि वर्तनांना संवादकांच्या इच्छेनुसार घडवण्याची जवळजवळ अप्रतिरोधक शक्ती देण्यात आली. आणि हीच शक्ती साहित्य आणि संस्कृतीवर देखील परिणाम टाकते.

साहित्य हा मानवी जीवन व्यवहारांचे चित्रण, विवरण, अर्थनिर्णयन आणि भाष्य करणारा भाषिक अभिव्यक्तीचा एक प्रकार आहे. ज्याच्यामध्ये प्रत्येक भाषेतून व्यक्त झालेल्या मानवी जीवनाविषयक अभिव्यक्ती, ज्यात लघुकथा, कादंबरी, कविता, महाकाव्य, खंडकाव्य, नाटक, शोकात्मिका, सुखात्मिका आणि प्रहसन अशा विविध प्रकारांचा समावेश असतो.

संस्कृती म्हणजे निसर्गाकडून मिळालेल्या गोष्टींवर माणूस करत असलेले संस्कार आणि प्रक्रिया यातून निर्माण होणारे विचार, चालीरीती, पद्धती. ही लोकांच्या सामूहिक जीवनातील मूल्ये, विश्वास, भाषा आणि संवाद पद्धती यांचा समावेश करते.

साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध हा अतूट आहे. त्याचबरोबर साहित्य हे संस्कृतीचे प्रतिबिंब आहे आणि संस्कृतीला आकार देणारे महत्त्वाचे माध्यम ठरते. त्याचबरोबर साहित्य निर्मितीसाठी संस्कृती एक संदर्भ आणि प्रेरणा पुरवते.

प्रसार माध्यमांचा साहित्य व संस्कृतीवर होणारा परिणाम या विषयावर चिंतन करतेवेळी प्रसारमाध्यमांचाही वेगळा आढावा येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे. बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पासून सुरू झालेली प्रसार माध्यमांची घोडदौड निश्चितच नेत्रदीपक आहे. प्रसार माध्यमांमध्ये मुद्रित आणि दृक-श्राव्य माध्यमांचा समावेश होतो.

**भाषिक देवाण-घेवाण:**

डिजिटलीकरणामुळे मराठीसह अनेक प्रादेशिक भाषांचे साहित्य उपलब्ध होते, अनुवाद सहज होतात, आणि स्थानिक सांस्कृतिक घटक जास्त लोकांपर्यंत पोहोचतात. मराठी साहित्याचे डिजिटल रूपांतरण या प्रक्रियेला चालना देत आहे. वर्तमान काळामध्ये जागतिकीकरणाच्या

पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांमध्ये प्रचंड क्रांती घडून आली आहे. मुद्रित घटक असो वा दृक-श्राव्य घटक, साधने अद्ययावत झालेली आहेत. 'जग एक खेडे' संकल्पनेनुसार तंत्रज्ञान आणि संगणकीय क्रांती या प्रसार माध्यमांसाठी अत्यंत निर्णायक ठरली आहे. त्याचबरोबर प्रसारमाध्यमांचा साहित्य आणि संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो. ही माध्यमे समाजाच्या प्रतिमा, मूल्ये आणि अपेक्षांना आकार देण्यास मदत करतात. ज्यामुळे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वर्तनांवर परिणाम होतो.

प्रसार माध्यमांमुळे साहित्य आणि संस्कृतीत ज्ञान आणि माहितीचा प्रसार होतो. ज्यामुळे सांस्कृतिक विविधता वाढते व लोकांमध्ये जागरूकता निर्माण होते. ही माध्यमे लोकांना शिक्षित करतात, लोकांना विविध सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विषयांबद्दल माहिती देतात. यामुळे लोकांमध्ये जागरूकता वाढते आणि ती शिक्षित होतात. प्रसार माध्यमे फक्त लोकांना जागरूक न करता त्यांना विविध देशातील साहित्य व संस्कृती यांची ओळख करून देतात. माध्यमांतून मिळणारी नवीन कल्पना, विचार आणि मूल्यांचा प्रसार करतात.

दूरदर्शन, रेडिओ, इंटरनेट, सिनेमा यासारख्या माध्यमांमुळे साहित्य व संस्कृती लोकांपर्यंत पोहोचवली जाते.

प्रसारमाध्यमांचे साहित्य व संस्कृतीवर ज्याप्रमाणे सकारात्मक परिणाम दिसतो, त्याचप्रमाणे नकारात्मक परिणाम देखील पाहायला मिळतो. ज्यामुळे समाजातील पारंपरिक मूल्यांचे क्षरण, संस्कृतीचे जागतिकीकरण, एखाद्या साहित्याबद्दल चुकीच्या माहितीचा प्रसार, त्यामुळे समाजातील नैतिकतेचा ऱ्हास आणि साहित्यकृतींच्या गुणवत्तेत घट पाहायला मिळते.

प्रसारमाध्यमे जागतिक संस्कृतीचा प्रवाह समाजात आणतात, ज्यामुळे स्थानिक आणि पारंपरिक संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडतो आणि स्थानिक संस्कृतीची ओळख कमी होते.

प्रसारमाध्यमे ही साहित्य आणि संस्कृती यांच्यातील सेतूची भूमिका पार पाडतात. त्यांनी साहित्य व सांस्कृतिक समृद्धीला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, ज्यामुळे माहितीचा प्रसार, जागरूकता आणि विविधतेचा सन्मान वाढीस लागलेला दिसतो. मात्र, याच माध्यमांमुळे जागतिकीकरणाचा प्रभाव स्थानिक संस्कृती व साहित्यावर पडतो आहे, ज्यामुळे पारंपरिक मूल्यांची गळचेपी,

नैतिकतेचा ऱ्हास आणि साहित्यिक दर्जाची घसरण अशी नकारात्मक स्थितीही उद्भवते. म्हणूनच, प्रसारमाध्यमांचा योग्य वापर करून त्यांच्या माध्यमातून साहित्याची समृद्धी आणि संस्कृतीचे संवर्धन करण्याची गरज आहे. सर्जनशीलता, विवेक आणि जबाबदारीने वापर केल्यास ही माध्यमे समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक प्रगतीस निश्चितच हातभार लावू शकतात. प्रसारमाध्यमे -विशेषतः डिजिटल माध्यमे -साहित्य व संस्कृतीस दैनंदिन जीवनात अधिक जवळ आणली आहेत. ही एक सुवर्णसंधी आहे जर त्याचा विवेक, गुणवत्तेवर भर आणि सांस्कृतिक संवेदनशीलता ठेवून वापर केला गेला तर. अन्यथा व्यावसायिक दबाव आणि सांस्कृतिक समरूपीकरण हे धोके पुढे येऊ शकतात. म्हणून शासन, प्रकाशक, प्लॅटफॉर्म आणि शिक्षणसंस्था या सगळ्यांनी मिळून धोरणे आणि स्थानिक संस्कृतीचे संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

## संदर्भ:


1. डॉ. ग. म. कुलकर्णी, प्रसार माध्यमे आणि समाज – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
2. डॉ. श्रीपती रायमाने, मराठी साहित्य आणि संस्कृती : परंपरा व परिवर्तन – साई प्रकाशन, निपाणी.
3. डॉ. रा. ग. जाधव, साहित्य, संस्कृती आणि माध्यमे – लोकप्रिय प्रकाशन, मुंबई.
4. डॉ. अनिल गवई, प्रसार माध्यमे : स्वरूप आणि प्रभाव – प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
5. डॉ. बाळासाहेब भोईर, समाज, साहित्य आणि माध्यमे – विद्या प्रकाशन, नागपूर.
6. डॉ. माधव देशपांडे, संस्कृती, माध्यमे आणि बदलते जीवन – ग्रंथाली, मुंबई.



**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.